लोकमत

# आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेत विद्यापीठाची बाजी

## मुले-मुली दोन्ही संघ खेलो इंडियास पात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भोपाळ येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष व महिला बॅडमिंटन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या मुले व मुलींच्या संघांनी अनुक्रमे मुंबई विद्यापीठ व आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचा पराभव करीत अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी मानांकनांसह खेलो इंडिया स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने शनिवारी सलग चार सामने जिंकून उपांत्यपूर्व म्हणजेच मानांकनासाठीच्या सामन्यांत आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २-० असा फडशा पाडला. यातून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेचे मानांकन मिळवत बॅडमिंटनमध्ये नवा इतिहास रचला. यात शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महावीर कॉलेजच्या ऋचा व प्रेरणा आळवेकर या दोघी भगिनींनी सर्वांग सुंदर खेळ केला. पहिल्या फेरीत प्रेरणाने आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या गार्गी जोशी हिचा २१-९, २१-१३ असा पराभव केला. तर दुहेरीत प्रेरणा व ऋचा या जोडीने गार्गी जोशी व रोहित हसकी या जोडीचा २१-७, २१-१२ असा सहज पराभव करीत उपांत्य फेरी गाठत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ व खेलो इंडिया स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठास मानंकन मिळाले. मुलींच्या प्रमाणे मुलांनीही गतवर्षीची परंपरा कायम ठेवत बलाढ्य मुंबई विद्यापीठास ३-१ असे पराभूत केले. पहिल्या सामन्यांत शिवाजी विद्यापीठाच्या हर्षल ठाकूरने मुंबईच्या प्रतीक रानडेचा २१-९, २१-१३ असा सहज पराभव केला. मात्र, त्यास एकेरीत मुंबईच्या सूर्यवंशीकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे दुहेरीचा सामना खेळावा लागला. यात सामन्यांत शिवाजी विद्यापीठ संघाच्या जोडीने मुंबईच्या प्रतीक राठोड-विराज काळे यांच्यावर २१-१८, २१-९ अशी मात करीत २-१ अशी आघाडी घेतली. तिसऱ्या एकेरीच्या सामन्यांत अनिरुद्ध मयेकर याने मुंबईच्या सुयोग लोखंडेवर २१-१२, २१-१६ अशी मात केली.

10 JAN 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्यातील ४ हजार शाळा, महाविद्यालये आजपासून बंद

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश; पुन्हा ऑनलाईन वर्ग सुरु होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी जिल्ह्यातील शाळे, महाविद्यालये सोमवार (दि. १०) पासून बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामध्ये चार हजार शाळा, महाविद्यालये बंद राहतील. मात्र, शिक्षक शाळेतून विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण देणार आहेत.

राज्य सरकारने कोरोना संसर्ग रोखण्यासाठी १५ फेब्रुवारीपर्यंत शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषद व खासगी प्राथमिक अशा मिळून सुमारे २ हजार ६४८ शाळा आहेत. यामध्ये २ लाख ९८ हजार ११ विद्यार्थी आहेत. माध्यमिकच्या १ हजार ६८ शाळा असून, ३ लाख ५० हजार विद्यार्थी आहेत. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत २७६ महाविद्यालये असून, २ लाख ६० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

विविध शैक्षणिक बोर्डांकडून दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्याचे उपक्रम सुरू राहणार आहेत. शालेय शिक्षण विभाग, कौशल्य, उद्योजकता विकास विभाग, तांत्रिक व उच्च शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग व अन्य वैधानिक प्राधिकरणांकडून परवानगी दिलेले उपक्रम सुरू असणार आहेत. १५ ते १८ वयोगटातील लसीकरण न झालेले व लसीकरणाची पूर्वनियोजित वेळ दिलेल्या विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयांत येण्यास परवानगी असणार आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशात म्हटले आहे.

- **जि.प., खासगी प्राथमिक शाळा - २,६४८, विद्यार्थी संख्या - २ लाख ९८ हजार ११**
- **माध्यमिक शाळा - १,०६८, विद्यार्थी संख्या - ३ लाख ५० हजार**
- **महापालिका शाळा - ५९, विद्यार्थी संख्या - १० हजार २००**
- **शिवाजी विद्यापीठ कक्षेतील महाविद्यालये २७६, विद्यार्थी संख्या - २ लाख ६० हजार**

■ शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्थांमधील वर्ग १५ फेब्रुवारीपर्यंत फक्त ऑनलाईन पद्धतीने सुरू असणार आहेत. विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्के ठेवावी, अशा सूचना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिल्या आहेत.

■ जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळांसह महापालिका क्षेत्रातील शाळा सोमवारपासून बंद राहणार आहेत. मात्र, शिक्षक शाळांतून ऑनलाईन शिकवणार असल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी आशा उबाळे, माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांनी सांगितले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ संगीत-नाटक महोत्सवाचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रसिद्ध नाटककार गो. पु. देशपांडे लिखित 'उद्ध्वस्त धर्मशाळा' नाटकातून शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थी कलाकारांनी राजकीय परिस्थितीमुळे हतबल झालेल्या एका प्राध्यापकाच्या जगण्याचा संघर्ष, अवस्थेवर प्रकाशझोत टाकला.

विद्यापीठ संगीत-नाटक महोत्सवात गो. पु. देशपांडे लिखित 'उद्ध्वस्त धर्मशाळा' नाटकाचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. राजकीय नेतेमंडळी एकत्र येऊन एका प्राध्यापकाच्या खासगी जीवनात वादळ निर्माण करतात. यातून निर्माण झालेल्या संघर्षावर नाटकातून भाष्य करण्यात आले. नाटकाचे दिग्दर्शन ज्ञानेश मुळे यांनी केले.

विभागाचे नाट्य अध्यापक डॉ. संजय तोडकर यांनी नेपथ्य व प्रकाशयोजना केले. अतुल परीट यांनी प्रास्ताविक केले. प्रसिद्ध नाट्यकर्मी डॉ. शरद भुताडिया, डॉ. शरद नावरे, डॉ. अनमोल कोठाडिया, विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, प्रा. डॉ. विनोद ठाकूर-देसाई, निखिल भगत उपस्थित होते.

पुण्यनगरी

# साहित्य वाचनाने कल्पनेचा विकास : गुरव

**बिद्री :** जीवन प्रगल्भ होण्यासाठी साहित्याचे वाचन गरजेचे आहे. त्यामुळे कल्पनेचा विकास होतो, असे प्रतिपादन मराठीचे आघाडीचे लेखक किरण गुरव यांनी केले. बिद्री, ता. कागल येथील श्री दूधसाखर महाविद्यालयात मराठी विभागाने आयोजित केलेल्या माझी साहित्य निर्मिती प्रक्रिया या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. संजय पाटील हे होते.गुरव म्हणाले, सभोवतालचे सूक्ष्म निरीक्षण करून लेखन करावे. व्यंकटेश माडगूळकर, राजन गवस यांच्या साहित्य लेखनाचा आपल्यावर प्रभाव असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. प्रा. सी. वाय. जाधव, डॉ. एन. एम. पाटील आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ. आनंद वारके यांनी केले, तर आभार ग्रंथपाल अतुल नगरकर यांनी मानले. सूत्रसंचालन नितीन कांबळे यांनी केले.

10 JAN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेत 'शिवाजी'चा डबल धमाका

## मुले – मुली दोन्ही संघ अ. भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भोपाळ येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष व महिला बॅडमिंटन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या मुले व मुलींनी अनुक्रमे मुंबई विद्यापीठ व आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा पराभव करत अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी मानांकन मिळवले. हे दोन संघ खेलो इंडिया स्पर्धेसाठीही पात्र ठरले आहेत.



शिवाजी विद्यापीठाच्या मुलींनी इतिहास घडवत सलग चार सामने जिंकून उपांत्यपूर्व म्हणजे मानांकनासाठीच्या सामन्यात आरोग्य विज्ञान विद्यापीठावर २-० असा एकतर्फी विजय मिळवत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी मानांकन मिळवले आणि बॅडमिंटनमध्ये नवा इतिहास रचला. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महावीर कॉलेजच्या ऋचा आणि प्रेरणा आळवेकर या दोघी भगिनींनी सुंदर खेळ केला.

पहिल्या एकेरीमध्ये प्रेरणाने आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या संघाच्या गार्गी जोशीवर २१ - ९ व २१ - १३ असा सहज विजय मिळवला, तर दुहेरीत प्रेरणा व ऋचा यांच्या जोडीने गार्गी जोशी आणि रोहित हसकी या जोडीचा २१ - ७ व २१ - १२ असा सहज पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश मिळवत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ व खेलो इंडिया स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठास मानांकन मिळवले.

मुलांनीही गतवर्षीची परंपरा कायम ठेवत बलाढ्य मुंबई विद्यापीठास ३ - १ असे पराभूत केले. पहिल्या सामन्यात शिवाजीच्या हर्षल ठाकूरने मुंबईच्या प्रतीक रानडेवर २१ - ९ व २१ -१३ असा सहज विजय मिळवला; पण दुसऱ्या एकेरीत मुंबईच्या सूर्यवंशीकडून शिवाजीचा हर्षल जाधव पराभूत झाल्याने दुहेरीचा सामना खेळावा लागला. या सामन्यात शिवाजीच्या जोडीने मुंबईच्या प्रतीक राठोड व विराज काळे यांच्यावर २१ - १८ व २१ - ९ अशी मात करत २ - १ अशी आघाडी घेतली.

तिसऱ्या एकेरीच्या सामन्यात शिवाजीच्या अनिरुद्ध मयेकर याने मुंबईच्या सुयोग लोखंडेवर २१ - १२ व २१ - १६ अशी मात करत मानांकनाचा सामना जिंकून संघास अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेसाठी पात्र ठरवले.

संघासोबत डॉ. राजेंद्र रायकर हे प्रशिक्षक आहेत. या दोन्ही संघांचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे.

# वास्तववादी लेखनासाठी आतला आवाज ऐका

## डॉ. किरण गुरव : उलगडला आजवरच्या साहित्य लेखनाचा प्रवास

कोल्हापूर, ता. ९ : "आजचा वाचक हा उद्याचा लेखक असतो. स्वतः चांगलं लिहिणं, हा सर्वात मोठा पुरस्कार असतो. मात्र, वास्तवाला भिडणारं लिखाण होण्यासाठी नवसाहित्यिकांनी आतल्या आवाजाला साद घातली पाहिजे, असे स्पष्ट मत साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक, शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक डॉ. किरण गुरव यांनी व्यक्त केले. 'सकाळ'च्या 'कॉफी वुईथ सकाळ' या उपक्रमांतर्गत त्यांनी सकाळ परिवारातील सदस्यांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. मुळात मेकॅनिकल इंजिनिअर असलेल्या डॉ. गुरव यांचा साहित्य प्रवास सुरू झाला तो स्वानुभावातूनच. पण, या साऱ्या गोष्टींकडे तटस्थपणे पहात त्यांचा हा लेखन प्रपंच विस्तारत गेला आणि ती वाचकप्रिय होतानाच विविध पुरस्कारांचा मानकरीही ठरला. या सारा प्रवास यानिमित्ताने उलगडला.


किरण गुरव

मुळात घरच्यांपासून लपून वाचणारा मी वाचक होतो. कारण दिवाळी अंक आणि शेतातली सुगीची धांदल एकाचवेळी असायची आणि मग लपूनच जागा मिळेल तिथे बसून पुस्तके, दिवाळी अंक वाचत बसायचो. दहावीला चांगले गुण मिळाल्यानंतर घरच्यांनी इंजिनिअर करायचं ठरवलं आणि 'डीएमई' केलं. मग, विविध औद्योगिक आस्थापनातून प्रवास सुरू झाला आणि पुढे या प्रवासातील अनुभवांच्या शिदोरीवरच लेखनाची प्रेरणा मिळाली. 'जुगाड' ही कादंबरी याच अनुभवविश्वावर आधारित आहे. मात्र, अनुभव मांडणं म्हणजे कादंबरी नसते तर ती वाचकाला जिवंत वाटणारी असावी लागते, असेही डॉ. गुरव सांगतात.

विविध प्रकारचे साहित्य, वाचनसंस्कृती आणि प्रकाशकांची भूमिका या प्रश्नावर ते सांगतात, "सुरुवातीच्या काही लेखनानंतर माझी मला भाषा सापडली आणि आता तरी भाषा म्हणजे मन, अशीच व्याख्या मी करतो. लेखनातही स्वतःची वाट स्वतःच निवडायची असते आणि चांगल्या लेखनाची वाचक, प्रकाशक कदर करतात. त्यासाठी स्वतः स्वतःचे समीक्षण करण्याचीही गरज असते. वाचन संस्कृतीचा एकूणच विचार करता प्रत्येकाने जे उपलब्ध असेल ते वाचलं पाहिजे. चांगला वाचक निर्माण होणं ही आता गरज आहे."

पुरस्कारप्राप्त 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' कथासंग्रहाबद्दल ते सांगतात, "कथा हा माझ्या आवडीचा विषय आहे आणि 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' हा कथासंग्रह खेड्यातील तमाम तरुणांना आपलासा वाटतो. कारण या कथेतील बाळू त्यांचा प्रतिनिधी आहे. शिक्षणासाठी खेड्यातून शहरात आल्यानंतर त्याचे स्थलांतर हे हळूहळू मानसिक अवस्थांतर बनते. हा एक सार्वत्रिक अनुभव आहे. भविष्यात कथा मी लिहिणारच आहे. पण, 'गस्त' या कादंबरीवर सध्या काम सुरू आहे. एका गावात बाहेरून रात्रीचे दगड पडतात आणि त्या घटनेवर आधारित ही रहस्यमय कादंबरी असेल."

दरम्यान, सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार यांच्या हस्ते डॉ. गुरव यांचा सत्कार झाला. निवासी संपादक निखिल पंडितराव यांनी स्वागत केले.

### 'सकाळ'ने दिले लेखनाचे बळ

माझ्या 'इस्तू' या पहिल्या कथेला 'सकाळ'नेच प्रसिद्धी दिली होती. पुढे 'साप्ताहिक सकाळ'च्या कथा स्पर्धेत सहभागी होऊ लागलो आणि त्यातही बक्षिसे मिळाली. २००१ ला 'गावकी' या कथेला पारितोषिक मिळाले. एकूणच लेखन प्रवासात 'सकाळ'ने नेहमीच बळ दिल्याचेही श्री. गुरव यांनी आवर्जुन सांगितले.

### साहित्यिकांनी भूमिका घ्यावीच

अलीकडच्या काळात समाजातील वर्तमानावर साहित्यिक, कलाकार स्पष्ट भूमिका घेताना दिसत नाहीत, या प्रश्नावर डॉ. गुरव म्हणाले, "साहित्यिकाने स्पष्ट भूमिका घेतलीच पाहिजे. कारण साहित्यिक म्हणून समाजात तुमची वेगळी ओळख असते तरी समाजापासून तुम्ही वेगळे असू शकत नाही. साहित्याला सध्या एक वेगळाच आयाम मिळत आहे. तसे प्रयत्नही सुरू आहेत. साठोत्तर साहित्याची चर्चा ऐंशीच्या दशकात सुरू झाली. त्यामुळे सध्याच्या साहित्याची चर्चा आणखी किमान दहा वर्षांनी नक्कीच होईल."

10 JAN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शास्त्रीय गायन, तबला वादनाला रसिकांची दाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

देवल क्लबमध्ये शुक्रवारी सायंकाळी आयोजित केलेला संगीत नाटक महोत्सव प्रशास्त्रीय गायनातील राग आणि तबला वादनाने गाजला. डॉ. रवीकिरण नाकोड यांनी तबला वादनातून तीनताल सादर करत रसिकांची मने जिंकली. ग्वाल्हेर–आग्रा घराण्याचे प्रसिद्ध गायक मुकुल कुलकर्णी यांनी बहारदार शास्त्रीय गायन करुन दाद मिळवली.

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्यावतीने या महोत्सवांचे आयोजन केले होते. देवल क्लबचे संचालक सुबोध गद्रे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी प्रास्ताविक केले. पहिल्या सत्रात डॉ. रवीकिरण नाकोड यांनी एकल तबलावादन केले. तीनताल सादर करताना पेशकार, कायदा, गत, रेला आदी रचना मांडत मने जिंकली.



कोल्हापूर : संगीत नाटक महोत्सवात शास्त्रीय गायन करताना गायक मुकुल कुलकर्णी.

शिवराज पाटील यांनी नाकोड यांना नगमा साथ केली. दुसऱ्या सत्रात ग्वाल्हेर–आग्रा घराण्याचे मुकुल कुलकर्णी यांचे बहारदार शास्त्रीय गायन झाले. त्यांनी मैफलीची सुरुवात राग पूरवामधील 'पिहरवा के बसो' विलंबित तिल वाड्यातील रचना सादर करुन महोत्सवात ताजेपणा आणला. राग यमनमधील ताल रुपकमधील बंदिश आणि एकतालातील तराणा रचनाही त्यांनी सादर केली. अमित साळोखे यांनी संवादिनीसाथ केली. निखील भगत यांनी तबलासाथ केली. या 'संगीत–नाटक महोत्सवा'स पंडीत सुधीर पोटे, सुखदा काणे, पंडीत राजप्रसाद धर्माधिकारी व डॉ. नंदकुमार जोशी आदी उपस्थित होते. डॉ. विनोद ठाकुरदेसाई यांनी आभार मानले.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या टॉप टेनमध्ये 'डीवायपी टेक्निकल'चे ९ विद्यार्थी

वार्ताहर
नवे पारगाव

शिवाजी विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या कॉम्प्युटर सायन्स पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली आहे. यामध्ये तळसंदे (ता. हातकणंगले) येथील डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस कॉम्प्युटर सायन्स विभागातील ९ विद्यार्थी टॉप टेनमध्ये झळकले आहेत.

शिवाजी विद्यापीठामार्फ़त २०२०–२१ च्या अंतिम सत्राच्या परीक्षा घेतल्या होत्या. या परीक्षेत गुणवत्ता यादीत 'डी. वाय. पाटील'च्या विद्या व्हरकतने प्रथम स्थान पटकावला. तर ओंकार चव्हाण (दुसरा), प्रतीक्षा सुतार (तिसरी), मेघा शिंदे (चौथी), शिवराज मोहिते (पाचवा) , स्नेहल निकम (सहावी), प्राजक्ता शिंदे, तेजल शिंदे (दोघीही सातवी), महेश पाटील (आठवा) अशा ९ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत टॉप टेनमध्ये येण्याचा मान मिळवला आहे.

या विद्यार्थ्यांसह अन्य विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्हद्वारे टीसीएस, इन्फोसिस, विप्रोसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे, असे कॅम्पस डायरेक्टर डॉ. सतीश पावसकर यांनी सांगितले. सर्व विद्यार्थ्यांचे व कॉम्प्युटर विभाग प्रमुख प्रा. उमेश पाटील, प्राध्यापकांचे डॉ. पावसकर यांनी अभिनंदन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष व गृहराज्यमंत्री सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता, कॅम्पस डायरेक्टर डॉ. सतीश आर. पावसकर, रजिस्ट्रार प्रकाश भागाजे, डीन अकॅडेमिक्स प्रा. आर. एस. पोवार यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.